## नियमित दिवाणी दावा क्रमांक १८१/२०२१ मधील नि.क्र.४१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादीने मयत प्रतिवादी क्र. २ हिराबाई बळवंत शेंडगे यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करुन मयताचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. २ ह्या दिनांक १५.०४.२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या दरम्यान वाद असून मयत प्रतिवादी क्र. २ यांच्या पश्चात त्यांच्या वारसांच्याविरुध्द वादींना दावा चालविण्याचा हक्क आहे. प्रतिवादी क्र. २ चा मृत्युचा दाखला वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे मुदतीत प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेता आले नाहीत व सदरचा दावा तिचेविरुध्द अबेट झाला आहे. दाव्यामध्ये कोणतीही तांत्रीक त्रुटी राहू नये याकरीता मयत प्रतिवादी क्र.२ विरुध्द अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मयताचे वार अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब वादीची विनंती आहे की, मयत प्रतिवादी क्र. २ विरुध्द झालेला अबेटमेंट चा आदेश रदद करण्यात यावा.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात नमूद केलेले कारण योग्य व बरोबर नाही, प्रतिवादी क्र. १ ने दिनांक ०५.०२.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. २ हे मयत असल्याचा मृत्युचा उतारा दाखल केलेला आहे. वादीने अर्जात नमूद केलेले कारण चुकीचे आहे. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. अर्जदारांचे कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी क्र. २ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जामधील मजकुरावरुन प्रतिवादी क्र. २ हिराबाई बळवंत शेंडगे ह्या दिनांक १५.०४.२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचा कब्जा मिळण्यासाठी व निरंतर ताकीदिसाठी दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींच्या वारसांना दावा पुढे चालविण्याचा हक्क आहे. अभिलेखावरील वस्तुस्थिती लक्षात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य असून वारस रेकॉर्डवर घेऊन दुरुस्ती होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे मुळ दाव्यात बदल होणार नाही अगर स्वरुपही बदलणार नाही. वारसांना त्यांच्या हक्काबाबत दावा पुढे चालविण्याचा अधिकार आहे. सबब केसमधील वाद मुद्दा गुणदोषावर निकाली होणेसाठी मयत प्रतिवादी क्र. २ यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून तिचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब मुद्दा क्रमांक १ होकारार्थी देऊन मुद्दा क्रमांक २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

### आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी प्रतिवादी क्र २ हिराबाई बळवंत शेंडगे हिचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.01 17:43:36 +0530

वडूज.
दिनांकः-०१.१०.२०२५

( व्ही. बी. घाडगे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.